10.40
2-11-2021

Ulhasnagar municipal corporation
# उल्हासनगर महानगरपालिका
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर - ३

| दुरध्वनी क्र. | विस्तार क्र. | संकेत स्थळ. | ई-मेल आय डी. |
|---|---|---|---|
| ०२५१-२७२०११६-१२५ | २३२/२६८ | www.umc.gov.in | umc.sanitation@gmail.com |

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

जा.क्र.उमप/आवि/उप-आ/५६६ /२०२१
दिनांकः- ०१ / ११/२०२१

प्रति,

१) मे. ओरियन सिक्योर, दिल्ली - ११००४९
२) मे. झा. पी. ॲण्ड कंपनी, उल्हासनगर

**विषयः- आर्थिक बाब (Commercial) निविदा उघडणेस उपस्थित राहणेबाबत.**
**संदर्भः- उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ व स्वच्छ भारत अभियान मोहिम प्रभाविपणे राबविणेकामी व नागरीकांना शिस्त लावणेसाठी अभिकर्त्यामार्फत "स्वच्छता मार्शल" ची नियुक्ती करणेबाबत. (ई-निविदा क्र. 2020_UMC_697246_1)**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते कि, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ व स्वच्छ भारत अभियान मोहिम प्रभाविपणे राबविणेकामी व नागरीकांना शिस्त लावणेसाठी अभिकर्त्यामार्फत "स्वच्छता मार्शल" ची नियुक्ती करणेबाबत. ई- निविदा मागविण्यात आली होती.

त्याअनुषंगाने ई-निविदा कक्षा मार्फत प्राप्त अहवालाअन्वये एकुण ४ निविदाकाराकडून निविदा प्राप्त झाल्या आहे. त्यानुसार २ निविदाकार यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार पुर्तता केली असल्याने निविदा समितीने सदर २ निविदाकार यांचा निविदेचा दुसरा लिफाफा आर्थिक बाब उघडण्यास मान्यता दिली आहे.

तरी सदर निविदेचा दुसरा लिफाफा आर्थिक बाब दिनांक ०२/११/२०२१ रोजी दुपारी १२ :३० वाजता ई-निविदा कक्षात उघडण्यात येणार आहे. तरी आपण सदर निविदा उघडण्यास उपस्थित राहावे, ही विनंती.

उप-आयुक्त (आरोग्य)
उल्हासनगर महानगरपालिका

**प्रतः- माहितीस्तव.**
मा. निविदा समिती अध्यक्ष व निविदा सदस्य
२/ कृपया निविदा उघडण्यास उपस्थित राहावे.

**प्रतः- पुढील कार्यवाहीस्तव.**
१) सिस्टीम ॲनालीस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग
२) ई-निविदा समिती
३) सुरक्षा अधिकारी

10.40
2-11-2021

# Ulhasnagar municipal corporation
# उल्हासनगर महानगरपालिका

मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर – ३

| दुरध्वनी क्र. | विस्तार क्र. | संकेत स्थळ. | ई-मेल आय डी. |
|---|---|---|---|
| ०२५१-२७२०११६-१२५ | २३२/२६८ | www.umc.gov.in | umc.sanitation@gmail.com |

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

जा.क्र.उमपा/आवि/उप-आ/९६१/२०२१
दिनांक :०१ /११/२०२१

प्रति,
मे. ओरियन सिक्योर,
दिल्ली – ११००४९

**विषय:- उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ व स्वच्छ भारत अभियान मोहिम प्रभाविपणे राबविणेकामी व नागरीकांना शिस्त लावणेसाठी अभिकर्त्यामार्फत "स्वच्छता मार्शल" ची नियुक्ती करणेबाबत.**
**(ई-निविदा क्र. 2020_UMC_697246_1)**

**संदर्भ :- १) आपलेकडील दिनांक ०२/०९/२०२१, रोजीची ई-मेलद्वारे व प्रत्यक्ष प्राप्त झालेली हरकत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सविनय सादर करण्यात येते कि, आपण संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने घेतलेल्या हरकतीवर दिनांक १६/०९/२०२१ रोजी मा. अतिरीक्त आयुक्त तथा निविदा समिती अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली छाननी समिती व निविदासमिती यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत आपल्या संदर्भिय पत्रातील मुद्यावर चर्चा करण्यात आली. उपस्थित मुद्दे व त्यावर केलेल्या चर्चेत खालिल प्रमाणे सहमताने निर्णय घेण्यात आला आहे.

| अ.क्र. | उपस्थित मुद्दे | खुलासा |
|---|---|---|
| 1 | सुप्रिम कोर्टचे सुचनांना न पाळता जॉईंट वेंचर्स यांना टेंडर प्रोसेस मध्ये ॲक्सेपट केलेले आहे. त्याचा तपशील खालिल प्रमाणे आहे. | सुप्रीम कोर्टाने सदर निर्णयांमध्ये दिलेल्या तत्त्वांच्या प्रकाशात आणि वरील कारणांमुळे याचिकाकर्त्यांने मांडलेले वाद नाकारले जाण्यास ज़बाबदार आहेत, त्यानुसार रिट याचिका फेटाळली गेली होती. |
| a. | मे.झा.पी. ॲन्ड कंपनी आणि थ्रिल सिक्युरीटी फोर्स प्रा.लि. यांनी दिनांक २९/७/२०२१ रोजी जॉईंट वेचर्स बाबतचे जे ॲग्रीमेंट केलेले आहे ते रजिस्टर केलेले नसुन फक्त स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले आहेत आणि महाराष्ट्र स्टॅम्प ॲक्ट १९५८ नुसार स्टॅम्प डयुटी भरलेली नाही. उल्हासनगर महापालिकाद्वारे सदरचे ॲग्रीमेंट हे तपासुन इंस्पेक्टर ऑफ जनरल रेकॉर्डस/ जॉईन्ट डिस्ट्रीक्ट रेकॉर्डसला (स्टॅम्प डयुटी) ठाणे येथे पाठवावे व स्टॅम्प डयुटी भरणेकरिता पाठवावे. | नोटरी केलेले ॲग्रीमेंट ग्राहय असल्याबाबत एम.आय.डी.सी यांनी काढलेल्या निविदेची प्रत सोबत जोडलेली आहे. तथापी मे. झा.पी.ॲण्ड कंपनी व थ्रिल सिक्युरीटी फोर्स प्रा.लि. यांचे न्यूनतम दर प्राप्त झाल्यास स्टॅम्प डयुटी देणे बंधन कारक राहील. |
| b. | जी.एस.टी. चे प्रमाणपत्र हे जॉईंट वेंचर्सचे नावे नाहीत. | दोन्ही एजन्सीने स्वतंत्र जी.एस.टी. चे प्रमाणपत्र सादर केले आहे. तरी पात्र निविदाकार यांना कार्यादेश देण्यापुर्वी सदरची कागदपत्राची पुर्तता करुन घेण्यात येईल. |
| c. | पॅन कार्ड हे. जॉईंट वेंचर्सचे नावे नाहीत. | दोन्ही एजन्सीने स्वतंत्र पॅन कार्ड चे प्रमाणपत्र सादर केले आहे. तरी पात्र निविदाकार यांना कार्यादेश देण्यापुर्वी सदरची कागदपत्राची पुर्तता करुन घेण्यात येईल. |
| d. | ESIC रजिस्ट्रेशन जॉईंट वेंचर्सचे नावे नाहीत. | दोन्ही एजन्सीने स्वतंत्र ESIC रजिस्ट्रेशन चे प्रमाणपत्र सादर केले आहे. तरी पात्र निविदाकार यांना कार्यादेश देण्यापुर्वी सदरची कागदपत्राची पुर्तता करुन घेण्यात येईल. |
| e. | PF हे जॉईंट वेचर्सचे नावे नोंद नाहीत. | PF नोंदणीपत्र न्यूनतम दर प्राप्त होणा-या निविदाकारांकडून घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार |

| | | |
|---|---|---|
| | | पात्र निविदाकार यांना कार्यादेश देण्यापुर्वी सदर कागदपत्राची पुर्तता करुन घेण्यात येईल. |
| f. | प्रोफेशनल टॅक्स जॉईंट वेंचर्सच्या नावे नाहीत. | पात्र निविदाकार यांना कार्यादेश देण्यापुर्वी सदरची कागदपत्राची पुर्तता करुन घेण्यात येईल. |
| g. | जॉईंट वेंचर्सच्या ॲग्रीमेंट मध्ये झा.पी. ॲन्ड कंपनी हे भारतीय कंपनी ॲक्ट १९५६ नुसार दाखविण्यात आले आहे. व त्यावर प्रेमचंद झा यांनी प्रोपायटर असलेबाबत स्वाक्षरी केलेली आहे. त्यांनी कंपनीचे बोर्ड ऑफ डायरेक्टर यांचेशी संवाद साधुन याबाबत निर्णय घेवुन त्यास मान्यता देवुन तद्नंतर एकाने किंवा दोघांनी स्वाक्षरी करणेबाबतचा निर्णय त्यासोबत जोडला पाहिजे होता परंतु जोडलेला नाही तरी सदरचा दस्तऐवजाची महापालिकेमार्फत पुर्णपणे छाणणी करण्यात यावी याबाबत सुचविले. | मे. झा.पी.ॲन्ड कंपनी व थ्रिल सिक्युरीटी फोर्स प्रा.लि. यांना सदरचे काम मिळाल्यास सदरचे भारतीय कंपनी ॲक्ट १९५६ च्या अंतर्गत नोंदणी पत्र घेणे बंधनकारक असेल. त्यानुसार करारनामा करण्यापुर्वी मे. झा.पी.ॲन्ड कंपनी यांची सामायिकरण व डायरेक्टर यांच्या स्वाक्षरी केलेल्या कागदपत्राची पुर्तता करुन घेण्यात येईल. |
| h. | जीएसटी नोंदणी, ईपीएफ नोंदणी आणि ईएसआयसी अशी काही कागदपत्रे मे. झा पी ॲण्ड कंपनी यांच्या नावावर आहेत. जी केवळ भारतीय कंपन्या अधिनियम 1956 अंतर्गत तयार केली जाऊ शकतात. संयुक्त उपक्रम फक्त तेव्हाच पूर्ण होतो जेव्हा सर्व नोंदणी संयुक्त नावावर असेल आणि संयुक्त उपक्रम वैध करण्यासाठी वैध कागदपत्रे सादर केली गेली तर उल्हासनगर महानगरपालिके मधील सर्व विभाग प्रमुख चांगले गुंतागुंतीचे आणि अनुभवी आहेत त्यांना या सर्व मूलभूत गोष्टींची चांगली माहिती आहे वरील सर्व कागदपत्रे मोठ्या प्रमाणावर पात्र कंत्राटदाराच्या अवास्तव बाजूने बोलतात हे झा यांना त्यांची व्यावसायिक बोली अपात्र ठरवण्यासाठी पुरेसे आहे त्यामुळे निविदा लिफाफा उघडता येत नाही ही तिसरी कॉल आहे. मे. झा पी ॲण्ड कंपनी अपात्रता आम्हाला निविदा वाटपासाठी आपोआप पात्र ठरेल.13/9/2021 च्या पत्राद्वारे तुमच्याकडून मागवलेल्या कागदपत्रांच्या संदर्भात असे म्हटले आहे की सर्व प्रमाणित कागदपत्रे तुम्हाला आधीच हार्ड आणि सॉफ्ट कॉपीच्या स्वरूपात सबमिट केली आहेत. आम्हाला सर्व कागदपत्रे पाहिल्यानंतरच तांत्रिकदृष्ट्या पात्र घोषित केले गेले आहे. आमची कागदपत्रे सार्वजनिक डोमेन मध्ये उपलब्ध आहेत आणि कोणत्याही वेळी क्रॉस सत्यापित केली जाऊ शकतात वरील सर्व कागदपत्रे मोठ्या प्रमाणावर पात्र कंत्राटदाराच्या अवास्तव बाजूने बोलतात हे मे. झा पी ॲण्ड कंपनी यांना त्यांची व्यावसायिक बोली अपात्र ठरवण्यासाठी पुरेसे आहे त्यामुळे उघडता येत नाही. ही तिसरी कॉल आहे मे. झा पी ॲण्ड कंपनी ची अपात्रता आम्हाला निविदा वाटपासाठी आपोआप पात्र ठरेल 13/9/2021 च्या पत्राद्वारे तुमच्याकडून मागवलेल्या कागदपत्रांच्या संदर्भात असे म्हटले आहे की सर्व प्रमाणित कागदपत्रे तुम्हाला आधीच हार्ड आणि सॉफ्ट कॉपीच्या स्वरूपात सबमिट केली आहेत आम्हाला सर्व कागदपत्रे पाहिल्यानंतरच तांत्रिकदृष्ट्या पात्र घोषित केले गेले आहे. आमची कागदपत्रे सार्वजनिक डोमेन मध्ये उपलब्ध आहेत आणि कोणत्याही वेळी क्रॉस सत्यापित केली जाऊ शकतात. | निविदा विक्री व स्विकृती दिनांक २१/०६/२०२१ ते ०५/०७/२०२१ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत होती. त्यादरम्याण एक ही निविदा प्राप्त झाली नाहीत. तद्नंतर दिनांक १५/०७/२०२१ पर्यंत सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत पर्यंत निविदा विक्री व स्विकृती करीता मुदत वाढ (1st Extension) देण्यात आली होती. त्यादरम्याण २ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. तद्नंतर दिनांक २२/०७/२०२१ पर्यंत सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत (2nd Extension) देण्यात आली होती. तद्नंतरही २ निविदाकारांच्याच निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्याने तीस-यांदा एक आठवडयाची मुदतवाढ दिनांक २९/०७/२०२१ रोजी सायंकाळी ५:०० वाजे पर्यंत (3rd Extension) देण्यात आली होती. तद्नंतर ४ निविदाकांराच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.<br>मे. झा.पी.ॲन्ड कंपनी व थ्रिल सिक्युरीटी फोर्स प्रा.लि. यांना सदरचे काम मिळाल्यास सदरचे भारतीय कंपनी ॲक्ट १९५६ च्या अंतर्गत नोंदणी पत्र घेणे बंधनकारक असेल. त्यानुसार करारनामा करण्यापुर्वी पात्र निविदाकारांमार्फत सामायिकरण व डायरेक्टर यांच्या स्वाक्षरी केलेल्या कागदपत्राची पुर्तता करुन घेण्यात येईल. |

त्यानुसार आपली हरकत निकाली काढण्यात येत आहे. व पात्र निविदाकार (मे. झा.पी.ॲन्ड कंपनी व मे. ओरियन सिक्योर,दिल्ली) यांच्या निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल. तरी आपण निविदेचा दुसरा लिफाफा उघडत्यावेळी ई-निविदा कक्षात उपस्थित राहावे.

प्रत :- १) सिस्टम ॲनालिस्ट
२) सुरक्षा अधिकारी
२) प्रसिद्धीसाठी

उप-आयुक्त (आरोग्य)
उल्हासनगर महानगरपालिका